शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परीषद जळगाव

Email-id-eoprizpjal@gmail.com

जा.क्र.शिक्षण/आस्था-३अ/आरआर/238/2023 | 3046 दिनांक :-17/07/2023

प्रति,

गटशिक्षणाधिकारी

पंचायत समिती सर्व

**विषयः-** जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवा निवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेबाबत.

**संदर्भः-** मा.उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.३६२/टिएनटी- १. दिनांक ७ जुलै २०२३

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरून संदर्भिय शासन पत्राचे अवलोकन व्हावे. शैक्षणिक सत्र २०२३- २४. मध्ये राज्यातील सर्व शाळा ह्या जून महिन्यात सुरु झालेल्या असून जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, नियोजित शिक्षक भरती संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमुळे भरती प्रक्रीयेस विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलं आहे. या सर्व परिस्थिती विचारात घेऊन पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त शिक्षकांमधून कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळांतील रिक्त शिक्षकीय पद खालील तरतुदीप्रमाणे भरण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

१.सदर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील.

२.मानधन रु. २००००/- प्रतीमाह (कोणत्याही इतर लाभाव्यतिरीक्त)

३.जिल्हा परिषदेच्यावतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी करारनामा स्वाक्षरीत करणे आवश्यक राहील.

४. बंधपत्र / हमीपत्र नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षकीय पदाचे विहीत काम पूर्ण करण्याची जवाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, या आशयाचे बंधपत्र / हमीपत्र घेण्यात यावे. या बंधपत्र / हमीपत्रामध्ये करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

५. प्रत्येक जिल्ह्यांसाठी संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पात्र व इच्छुक उमेदवारांमधून आवेदनपत्र मागवून नियुक्ती आदेश द्यावेत.

६. संबंधित शाळेतील रिक्त शिक्षकीय पदाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे अत्यावश्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी.

७. वरीलप्रमाणे करण्यात आलेली नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंतच असेल,

८. वरीलप्रमाणे नियुक्त्या १५ दिवसांच्या कालावधीत पूर्ण करण्यात याव्यात.

त्यानुसार आपणास सुचित करण्यात येते की, आपल्यास्तरावरून खालील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तातडीने कार्यवाही करून आवश्यक ती माहिती जिल्हा कार्यालयास सादर करावी.

**मार्गदर्शक सूचना :**

१. आपल्या तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमधील शाळांचा आढावा घेऊन शिक्षक पदांची अत्यावश्यकता व प्राधान्यक्रम निश्चित करून शाळांची निश्चिती करण्यात यावी. असे करीत असतांना विद्यार्थी संख्येच्या तुलनेत अनावश्यक व अतिरिक्त शिक्षक इतर शाळांमध्ये असणार नाहीत. याबाबत दक्षता घेण्यात यावी.

२. शून्य शिक्षक अथवा मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी संख्या असतांना पर्याप्त संख्येने शिक्षक नसलेल्या शाळांची गरज लक्षात घेण्यात यावी.

17/07/2023 16:54

३. मुद्दा क्रमांक २ व ३ मध्ये विषद केल्यानुसारच तालुक्यातील अत्यावश्यक गरज असलेल्या शाळांची नावे व आवश्यक शिक्षक संख्या निश्चित करून त्यांचा सुध्दा प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा.

४.सोबतच या कार्यालयाकडून तयार करण्यात आलेले वृत्त निवेदन सोबत संलग्नित करण्यात येत असून त्यास सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांपर्यंत पोहचविण्यासाठी समाज माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच कार्यालयाच्या सूचनाफलकावर सुध्दा प्रसिध्द करण्यात यावे.

५. इच्छुकांनी आपल्या कार्यालयास संपर्क साधल्यानंतर या पत्रासोबत दिलेल्या विहित नमुन्यातील आवेदन पत्रात आवश्यक त्या कागदपत्रांसह त्यांचे आवेदन प्राप्त करून घेण्यात यावे.

६. या सर्व कामासाठी तसेच इच्छुकांच्या शंका निरसनासाठी तसेच आवेदन पत्र प्राप्त करून घेऊन त्यासंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यासाठी आपल्या कार्यालयातील जबाबदार व्यक्तिची निवड करण्यात यावी.

७. इच्छूकांच्या माहितीसाठी या पत्रासोबत संलग्नित बंधपत्राचा नमूना सुध्दा कार्यालयाच्या सूचनाफलकावर प्रसिध्द करण्यात येऊन इच्छुकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा.

८. दिनांक १९ जुलै २०२३ पर्यंत प्राप्त झालेले सर्व आवेदन पत्र संकलित करून गटशिक्षणाधिकारी यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अंतिम प्रस्ताव दिनांक २० जुलै २०२३ रोजी जिल्हा कार्यालयास सादर करावा.

९. अनावश्यक ठिकाणी करार तत्वावरील शिक्षक नियुक्ती करून शासनास आर्थिक भूर्दंड सोसावा लागणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. तसा प्रकार घडल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी गटशिक्षणाधिकारी यांची राहिल.

१०. गटशिक्षणाधिकारी यांनी निश्चित केलेली अत्यावश्यक गरज व प्राप्त झालेले आवेदन पत्र याप्रमाणे नियुक्ती आदेश देण्याबाबतची कार्यवाही मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद जळगांव यांच्या मान्यतेने केल्या जाईल.

११. सदर प्रक्रीयेत शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने सदर प्रक्रीया रद्द करणे किंवा त्यामध्ये अनुषंगिक बदल करणे याबाबतचे सर्वाधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव यांच्याकडे अबाधित राहतील.

डॉ.पंकज आशिया (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगांव

प्रत:- १. मा. शिक्षण आयुक्त शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर..
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक). प्राथमिक शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

17/07/2023 16:54

**शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद जळगांव**

**(सेवा निवृत्त शिक्षकांमधुन करार तत्वावर नियुक्तीसाठी अर्जाचा नमुना)**

**अर्जाचा नमुना**

उमेदवाराचा फोटो

(ग.शि.अ.यांनी

साक्षांकित केलेला)

| अ क्रं | माहितीचा मुददा | अर्जदाराने भरावयाचा तपशील |
|---|---|---|
| 1. | से.नि.शिक्षक/शिक्षिकेचे पुर्ण नाव | |
| 2. | जन्मतारीख | |
| 3. | निवासाचा पत्ता | |
| 4. | मोबाईल क्रमांक | |
| 5. | सेवा निवृत्ती दिनांक | |
| 6. | दि 01/07/2023 रोजी वय | |
| 7. | एकुण सेवा कालावधी | |
| 8. | सेवा निवृत्ती वेळी कार्यरत पदनाम | |
| 9. | सेवा निवृतती वेळी कार्यरत शाळेचे नाव व पत्ता | |
| 10. | शाळेचे व्यवस्थापन (जि.प./खाजगी अनुदानीत) | |
| 11. | शैक्षणीक पात्रता व माध्यम | |
| 12. | व्यावसायीक पात्रता | |
| 13. | अध्यापनाचे विषय (माध्यमिक पदासाठी) | |
| 14. | बॅंक खात्याचा तपशील बॅंकेचे नांव | |
| | खाते क्रमांक | |
| | शाखा | |
| | IFSC CODE | |
| 15. | कोण्त्या तालुक्यामध्ये सेवा करण्याची तयारी आहे.(प्राधान्य क्रमांने नावे दयावी) | 1. 2.<br>3. 4. |
| 16. | याच्याव्यतिरिक्त इतर तालुक्यामध्ये नियुक्ती दिल्यास काम करण्याची तयारी आहे का? | |

**सोबत जोडावयाची कागदपत्रे-**

1. सेवानिवृत्ती आदेशाची प्रत
2. आधार कार्ड
3. बॅंक पासबुक झेरॉक्स/रदद केलेला धनादेश
4. रजिस्टर मेडीकल प्रॅक्टीसनर्स यांचे फिटनेस प्रमाणपत्र

मी प्रतिज्ञापुर्वक लिहुन देतो/देते की वरील माहिती पुर्णत: खरी आहे.सदर नियुक्तीबाबत सर्व अटी व शर्ती मी काळजीपुर्वक वाचल्या असुन,त्या मला मान्य आहेत.तरी मला जि.प.जळगांव अंतर्गत कंत्राटी सहयोगी शिक्षक पदावर नियुक्ती दयावी ही विनंती.

**स्वाक्षरी**----------------------------------

**दिनांक** :-

**अर्जदाराचे नाव**--------------------------

# बंधपत्र / सेवा करारनामा

**आज दिनांक --------------------------------रोजी खालील प्रमाणे करार केला.**

| | |
|---|---|
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद जळगांव | या करारासाठी पक्ष क्रं 1 |

**आणि**

| | |
|---|---|
| ---------------------------------<br>---------------------------------<br>--------------------------------- | या करारासाठी पक्ष क्र. २ |

सदर सेवा कराराचे नियमन करणाऱ्या अटी/शर्ती खालीलप्रमाणे असतील.

१. करार कर्मचाऱ्यांचे नांव-------------------------------------------पक्ष क्र.२ यांची नेमणूक करार तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात सहयोगी शिक्षक या पदावर शैक्षणिक कामासाठी झालेली आहे कामाचा कालावधी --------------- ते --------------------- पर्यंत, नियिमत शिक्षक नियुक्त होईपर्यंत किंवा वयाची ७० वर्ष पूर्ण होईपर्यंत यांपैकी जे आधी घडेल तो पर्यंत राहिल.

२. सदर पदावर काम करतांना शिक्षक म्हणून शासनाने विहित केलेली कर्तव्ये व जबाबदारी पार पाडणे बंधनकारक राहील.

३. सदर कामासाठी पक्ष क्र. १ हे पक्ष क्र २ यांना प्रती मास रूपये/-२०००० (अक्षरी रूपये बीस हजार.) एकत्रित मानधन दिले जाईल. या व्यतिरीक्त कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच सेवा कालावधीतील कोणतेही उत्तरदायित्व पक्ष क्रमांक १ यांच्या वर असणार नाही.

४. सदर सेवा करार हा पक्ष क्र२ यांना एक महिन्याच्या पूर्व सुचनेने समाप्त करता येईल. तथापि पक्ष क्र२ यांचे वर्तन व कामकाज असमाधानकारक असल्याचे मत झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदर सेवा करार संपुष्टात आणण्याचे सर्वाधिकार पक्ष क्र १ यांना राहतील.

५. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे करारात नमुद केलेल्या बाबी व्यतीरिक्त (वेळोवेळी केलेल्या सुधारणासह अन्य सर्व नियम पक्ष क्र.२ यांना लागू राहतील.

६. पक्ष क्र २ हे पक्ष क्र १ यांनी निश्चीत करून दिलेल्या शाळेत पूर्णतः स्वतःचे जबाबदारी वर काम करेल व कराराचे कालावधीत कोणत्याही अनपेक्षित कारणामुळे अथवा झालेल्या अपघातामुळे त्यास कोणत्याही प्रकारची शारिरीक व मानसिक इजा झाल्यास पक्ष क्र. १ कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

७. पक्ष क्र.२ हा शाळेतील सर्व यंत्रसाम्रगी उदा. दृकश्राव्य साधने, संगणक, इत्यादी जी त्यास काम करण्यासाठी हाताळण्यास देण्यात येतील, त्याचा काळजीपूर्वक वापर करून सदर यंत्राचे कोणत्याही तऱ्येचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेईल अन्यथा पक्षक्र.२ कारवाईस पात्र राहिल.

८. पक्ष क्र. २ हा पक्ष क्र. १ चे कार्यालयीन काम करतांना त्याचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणिव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता राखेल.

९. पक्ष क्र.२ यांना सेवाकराराचे कालावधीत अन्य ठिकाणी कोणतेही काम स्विकारण्यास मनाई राहिल.

१०. पक्ष क्र.२ शाळेमध्ये काम करण्यासाठी वक्तशिरपणे, नियमित व पुर्णवेळ उपस्थित राहिल तसेच पक्ष क्र. २ ची नेमणूकीच्या ठिकाणची वर्तणुक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहिल पक्ष क्र.१ च्या सर्व हितसंबंधाचे रक्षण करेल.

११. पक्ष क्र. १ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व सुचना क्र. २ वर बंधनकारक राहतील. व त्याच प्रमाणे विहित केलेल्या गुणवत्तेनुसार पक्ष क्र.२ कडुन काम न झाल्याचे पक्ष क्र. १ चे निदर्शनास आल्यास सदर सेवा करार तात्काळ रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ यांचे कडे राहतील.

१२. या सेवा करारपत्राचे कोणत्याही कलमाबाबत वा अन्य कोणत्याही नियमाबाबत विवाद निर्माण झाल्यास पक्ष क्र. १ चा निर्णय अंतिम राहिल. व त्याबाबत कोणत्याही तऱ्येची तक्रार/सुचनेची दखल घेतली जाणार नाही.

१३. करार कर्मचाऱ्यांचे सेवाकाळात आर्थीक देणे कर्मचाऱ्यांकडुन निर्माण झाल्यास ते' जमीन महसुला च्या थकबाकी प्रमाणे (Arrears of land Revenue) वसुल करण्यात येईल.

१४. करार तत्वावरील नियुक्ती सन २०२३-२४ च्या शिक्षक पदभरती प्रक्रीयेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

दिनांक :-

स्वाक्षरी-----------------------------------

(नाव -------------------------------------------------)

**पक्ष क्रं 2**

दिनांक

स्वाक्षरी-----------------------------------

(नाव -------------------------------------------------)

**पक्ष क्रं 1**

**साक्षीदार**:-

1. ---------------------------------------------------------------

2.---------------------------------------------------------------